|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

**विद्यार्थी विकास विभाग**

जा.क्र. कबचौउमवि/14/47/ 78 /2020 दि.03/07/2020

**प्रति,**

1) **मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख**
   **कबचौउमविशी संलग्नित महाविद्यालये, मान्यताप्राप्त परिसंस्था**
2) **मा. संचालक / विभागप्रमुख, विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा - विभाग यांना**

**विषय:- विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या नियुक्ती बाबत...**

महोदय / महोदया,

आपणास विदीतच आहे की, महाराष्ट्र शासनाने दि. 1 मार्च, 2017 पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, 2016 लागू केला आहे. सदर अधिनियमाची Soft Copy विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याची प्रत पुढील कार्यवाहीसाठी विद्यापीठ पत्र क्र.उमवि/2/46/2017, दि. 11/03/2017 अन्वये आपल्या ईमेलवर निर्गमीत केली आहे. या अधिनियमामधील कलम 56 (2) मध्ये नमूद आहे की,

विद्यार्थ्यांना सहाय्य करण्यासाठी आणि विद्यार्थ्याच्या तक्रारींचे सत्वर निवारण करण्यासाठी तरतूद करण्याकरीता कार्यकारी स्तरीय यंत्रणा उभारण्याकरीता विद्यापीठ, महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्थांमध्ये एक विद्यार्थी विकास कक्ष आणि विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष असेल हे कक्ष खालीलप्रमाणे असतील -

**(क) विद्यार्थी विकास कक्ष, ---**

विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित विविध पैलूंमधील व त्यांचे शैक्षणिक कार्य, व्यक्तिमत्व विकास व विद्यापीठ परिसरातील निकोप जीवनाशी संबंधित इतर पैलू यामधील प्रश्न व अडचणी यामध्ये सहाय्य करण्यासाठी एक विद्यार्थी विकास कक्ष असेल. संचालक, विद्यार्थी विकास हा विद्यापीठातील अशा कक्षाच्या प्रमुखपदी असेल. विद्यार्थी विकास कक्षामध्ये विद्यापीठ परिसरातील अध्यापकांमधून कुलगुरुने नामनिर्देशित केलेल्या इतर सात सदस्यांचा समावेश असेल आणि विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे अध्यक्ष व सचिव हे पदसिध्द सदस्य असतील. प्रत्येक महाविद्यालयामध्ये व मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये विद्यार्थी विकास कक्ष असेल आणि त्याच्या प्रमुखपदी उपप्राचार्य किंवा प्राचार्यांनी नामनिर्देशित केलेला वरिष्ठ अध्यापक असेल आणि अध्यापक, महिला अध्यापक, सामाजिक कार्यकर्ता, समुपदेशक यांचा समावेश करण्यासाठी प्राचार्याने नामनिर्देशित केलेले इतर चार सदस्य असतील आणि महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे पदाधिकारी हे पदसिध्द सदस्य असतील.

**(ख) विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष, ---**

विद्यार्थ्यांच्या तक्रारी दूर करण्यासाठी आणि अशा तक्रारी कमी करण्यासाठी आणि त्यास अटकाव करण्यासाठी निरनिराळे मार्ग व साधने उच्चतर प्राधिकरणांना सुचविण्यासाठी विद्यापीठामध्ये आणि प्रत्येक महाविद्यालय व मान्यताप्राप्त परिसंस्था यामध्ये विद्यार्थी तक्रार निवारण कक्ष असेल. विद्यार्थी तक्रार निवारण कक्षाची कामकाज विषयक कार्यकारी यंत्रणा ही, विद्यापीठ अनुदान आयोग (तक्रार निवारण) विनियम, 2012 किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेले इतर कोणतेही विनियम यांच्या तरतुदींनुसार तयार केलेल्या परिनियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असेल.

आपणास कळविण्यात येते की, अधिनियम 2016 तील विद्यार्थी विकासासाठी निर्देशाची अंमलबजावणी होण्यासाठी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील महाविद्यालये, मान्यता प्राप्त परिसंस्था व विद्यापीठ शैक्षणिक

प्रशाळा विभागांमध्ये विद्यार्थीभिमुख योजना व उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी आर्थिक वर्ष 2020-21 मध्ये जवळपास 603 लक्ष रुपयांची तरतूद विद्यापीठ अर्थसंकल्पात करण्यात आली आहे. या उपक्रमांचे कार्य अधिकाअधिक नियोजनबध्द, विद्यार्थ्यांसाठी प्रभावीपणे व शिस्तबध्द व्हावे याकरीता विद्यार्थी विकास अधिकारी असावा असा विद्यापीठ कार्यालयाचा प्रयत्न आहे. आपणही आपल्या स्तरावर नियोजन करावे व अधिनियम तरतूदीप्रमाणे कक्षाची रचना करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सत्वर सादर करावा.

विद्यार्थी विकास अधिकाऱ्याच्या माध्यमातून विद्यार्थीभिमुख उपक्रमांचे आयोजन व्हावे, त्यातून त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला चालना मिळावी, विद्यार्थ्यांमधील कलावंताला प्रोत्साहन मिळावे, विद्यार्थ्यांच्या सामाजिक व भावनिक समस्या समजून घेऊन त्यांना गरजेनुसार मार्गदर्शन व समुपदेशन करुन त्यांच्यातील उद्योन्मुख नेतृत्व घडविण्यासाठी प्रयत्न करावे, अशी विद्यार्थी विकास अधिकारी यांच्या नियुक्तीमागील प्रेरणा व हेतू आहे. विद्यार्थ्यांसाठी असलेले विविध उपक्रमाचे यश हे जसे विद्यार्थ्यांच्या सहभागावर अवलंबून असते तसे ते विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांच्या सक्रियतेवर व विद्यार्थीभिुख दृष्टिकोनावर सुध्दा अवलंबून असते. म्हणून आपल्याकडे अधिनियम तरतूदीतील कक्ष निर्माण होणे व विद्यार्थी विकास अधिकारी असणे गरजेचे आहे.

उपरोक्त बाब लक्षात घेता महाविद्यालय / मान्यता प्राप्त परिसंस्था / विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांनी खालील निकषाच्या आधारे विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती करुन त्यांच्या मान्यतेचा प्रस्ताव विद्यापीठ कार्यालयास सादर करावा.

1) आपल्याकडे विद्यार्थी संख्या 500 पर्यंत असेल तेथे एक **विद्यार्थी विकास अधिकारी** व एक **सहायक महिला विद्यार्थी विकास अधिकारी** यांची नियुक्ती करावी. तसेच आपल्याकडील विद्यार्थी संख्या 500 पेक्षा अधिक असेल तेथे एक **अतिरीक्त सहायक विद्यार्थी विकास अधिकारी** यांची नियुक्ती करावी.
2) एखाद्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचा सलग तीन वर्षाचा कार्यकाळ पूर्ण झालेला असेल तर त्यांना पुन्हा केवळ एका वर्षासाठी पुर्ननियुक्ती देता येईल, मात्र त्यास संचालक, विद्यार्थी विकास यांची मान्यता असणे आवश्यक असेल.
   एखाद्या प्राध्यापकाकडे राष्ट्रीय सेवा योजना (N.S.S. Programme Officer) कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय छात्र सेना (N.C.C. Officer) अधिकारी व क्रीडा संचालक (Director of Sports) अशी जबाबदारी असेल तर त्यांची विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करता येणार नाही. अशाप्रकारे नियुक्ती केली असल्यास ती तातडीने रद्द करावी, अन्यथा अशी नियुक्ती ग्राह्य धरली जाणार नाही.
3) **कबचौउमवि अंतर्गत केवळ महिलांसाठी असलेल्या मान्यता प्राप्त महाविद्यालये किंवा परीसंस्था/ विद्यापीठ शैक्षणिक प्रशाळा/ विभाग यांनी विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून महिला प्राध्यापकाची व पुरुष प्राध्यापकास सहायक विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून नियुक्ती करणे आवश्यक राहील.**
4) विद्यार्थी विकास अधिकाऱ्याचा कार्य कालावधी सलग तीन वर्षे राहील. त्यात त्यांनी विद्यार्थी विकासाच्या उपक्रमात प्रशिक्षक म्हणून जबाबदारी सांभाळणे आवश्यक राहील. तीन वर्षाच्या कालावधीत त्यांनी एकदाही "संघ व्यवस्थापक" म्हणून जबाबदारी पार पाडली नसेल, तर त्यांना विद्यापीठामार्फत प्रमाणपत्र दिले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.
5) विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागांतर्गत विविध योजना उदा.कमवा व शिका, युवती सभा (विद्यार्थीनी व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा व स्वयंसिध्दा अभियान), नियतकालीक स्पर्धा, विद्यार्थी परिषद सदस्य व सचिव निवड प्रक्रिया, युवारंग, स्नेहसंमेलन, विविध स्पर्धा, कार्यशाळा, कृतीसत्रे यांच्या आयोजन-संयोजन व समन्वयाची जबाबदारी विद्यार्थी विकास अधिकारी यांची राहील. याकामी त्यांनी मा.प्राचार्य / संचालक यांचे वेळोवळी मार्गदर्शन घेणे आवश्यक राहील. विद्यापीठाच्या एखाद्या योजनेची वा उपक्रमाची जबाबदारी मा.प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख गरजेनुसार एखाद्या महिला/पुरुष प्राध्यापकांवर जबाबदारी सोपवू शकतील. मात्र त्यांनी सुध्दा विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांच्या समन्वयाने कार्यभार सांभाळणे व त्याचा अहवाल, हिशेब विद्यार्थी विकास अधिकारी / प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख यांच्या स्वाक्षरीने सादर करणे आवश्यक राहील.

6) **विद्यापीठाने मान्यता दिलेल्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्यास त्याच्या विद्यार्थीभिमुख कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना, युवती सभा व युवक महोत्सव संघ सहभाग व इतर उपक्रमातील योगदानाबद्दल प्रती वर्ष विद्यार्थी विकास अधिकारी यांना रु.3000/- आणि सहायक विद्यार्थी विकास अधिकारी (महिला / पुरुष) यांना रु.1000/- मानधन व तीन वर्षाच्या कालावधीनंतर प्रशस्तीपत्र दिले जाईल. मात्र त्यासाठी दरवर्षी त्यांनी केलेल्या कार्यक्रमाचा विस्तृत अहवाल, विद्यार्थ्यांच्या उपक्रमातील सहभाग, छायाचित्रे वा इतर अनुषंगिक कागदपत्रे सत्यप्रतींसह दरवर्षी 31 मार्च पर्यंत आपल्या शिफारशीसह विद्यापीठ कार्यालयास सादर करणे आवश्यक राहील.**
7) विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून एखाद्या प्राध्यापकाचा कार्यकाळ पूर्ण झाला असेल तर त्यांची विद्यार्थी विकास मंडळ सल्लागार समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात यावी, जेणेकरुन त्यांचा विद्यार्थी उपक्रमांशी सातत्याने संपर्क राहील व उपक्रम अमंलबजावणीत त्यांचे मार्गदर्शन उपयुक्त ठरु शकेल.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम 2016 व विद्यापीठाने निर्धारीत केलेल्या उपरोक्त निकषांची नोंद घेऊन आपण ज्या विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांचा कार्यकाळ तीन किंवा तीन वर्षा पेक्षा जास्त झालेला असेल अशा विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांना एक वर्ष वाढीव मुदतीसाठी प्रस्ताव आपण पाठवू शकतात. **(परंतू सदर बाब ही नियोजनकर्त्याची ऐच्छिक राहील)** अन्यथा त्यांना पदभारातून मुक्त करुन त्यांच्या जागी नवीन विद्यार्थी विकास अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

नव्याने नियुक्त केलेल्या प्राध्यापकास विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून मान्यता मिळण्याचा प्रस्ताव, त्यांचे परिचयपत्र (Bio-data) त्यांना विद्यापीठाची प्राध्यापक म्हणून मान्यता असलेल्या पत्राची सत्यप्रत (University Approval letter) व कार्यभार हस्तांतर (Charge handover letter) पत्राची सत्यप्रत असा सविस्तर प्रस्ताव विद्यार्थी विकास विभागाकडे **दि. 31 जुलै, 2020** पर्यंत sw@nmu.ac.in या मेलवर पाठवावा (हार्ड कॉपी पाठवू नये). विद्यापीठाच्या मान्यतेनंतरच आपल्या विद्यार्थी विकास उपक्रमाच्या अनुदानाची रक्कम वा अग्रीम पाठविला जाईल, याची कृपया नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक व परिचयपत्र नमुना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर भेट दिल्यास circular link अंतर्गत Students Development and NSS मध्ये उपलब्ध आहे.

कळावे, धन्यवाद !

आपला विश्वासू,

(डॉ. पंकजकुमार नन्नवरे)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

सोबत:- वि.वि.अ. स्वयंवृत्त (Bio-Data)

**टिप -** 1) **विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून सन 2020-21 व 2021-22 पर्यंत मान्यता असल्यास नवीन प्रस्ताव पाठवू नयेत.**
2) विद्यार्थी विकास अधिकाऱ्यांची नियुक्ती केली नसल्यास त्यांना विद्यापीठाच्या कोणत्याही विद्यार्थी विकास योजनेचा लाभ देता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

*C:\\VBOXSVR\xp_data\RMB\SDO Appointment 2020-21.docx*

☎ : (९१) ०२५७-२२५७४१८, ४१९ वेबसाईट : www.nmu.ac.in
फॅक्स : (९१) ०२५७-२२५७४०३, ४०६ ई-मेल : sw@nmu.ac.in

# विद्यार्थी विकास अधिकारी / सहा.विद्यार्थी विकास अधिकारी (पु./म.)
## **स्वयंवृत्त** (Bio-Data)

१. प्राध्यापकाचे नांव :- ---------------------------------------------------

२. महाविद्यालयाचे नांव :- ---------------------------------------------------

व पत्ता ---------------------------------------------------

दूरध्वनी क्र. --------------- भ्रमणध्वनी क्र.------------

email ID : ---------------------------------------------

अलीकडील पासपोर्ट साईझचा रंगीत फोटो

३. जन्मतारीख :- ---------------------------------------------------------

४. शैक्षणिक अर्हता :- ---------------------------------------------------------

५. सेवेत नियुक्तीची तारीख :- ---------------------------------------------------------

६. अध्यापनाचा विषय :- ---------------------------------------------------------

७. गेल्या ३ वर्षात शिक्षण क्षेत्रातील अभ्यासेत्तर उपक्रमात केलेले नाविन्यपूर्ण कार्य :-

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

८. गेल्या ३ वर्षातील विद्यार्थीभिमुख व सामाजिक उपक्रमात सहभाग :-

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

९. राष्ट्रीय सेवा योजना /राष्ट्रीय छात्र सेना/क्रीडा संचालक म्हणून सहभाग होता का? असल्यास त्याचा तपशील

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

१०. आपणास विद्यार्थ्यांचा कोणकोणत्या समस्या जाणवतात ?

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

११. विद्यार्थी विकास अधिकारी म्हणून निवड झाल्यास आपण भविष्यात कोणकोणते उपक्रम राबवू इच्छिता.

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------------------

(----------------------------)

स्वाक्षरी व नाव

*C:\\VBOXSVR\xp_data\RMB\SDO Appointment 2020-21.docx*